सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६

दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२८

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.०४/०८/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र. ५९८ ते ठराव क्र. ६२७ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

D/Suryavanshi
महापौर,

सहाय्यक आयुक्त

महानगरपालिका सांगली

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

दैनिक सकाळचे छायाचित्रकार उल्हास नारायण देवळेकर वय वर्षे ५७ याचे मंगळवार दि.१५/०८/२०२३ रोजी अकस्मित निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.भारती हेमंत दिगडे

अनुमोदक :- श्री.आनंदा मारुती देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi.
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका सौ.कल्पना कल्लाप्पा कोळेकर यांचे चिरंजीव मेजर डॉ.चेतन कोळेकर (एम.बी.बी.एस.) हे सद्या गुजरात मध्ये सैन्यदलात मेजर या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी सैन्यदलात सेवा करीत असतानाच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परिक्षा देवून पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळवून M.D.Psychiatry (एम.डी.मानसोपचार) साठी प्रवेश मिळविला आहे ते आता Indian Navy मध्ये Surgen Lieutenant Commander (सर्जन लेफ्टनंट कमांडर) या पदावर काम करीत हा अभ्यासक्रम पूर्ण करणार आहेत. त्यांना मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.गितांजली सुर्यवंशी

अनुमोदक :- सौ.उर्मिला उदय बेलवलकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२८/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह सांगली हे सर्व आवश्यकत्या साधनसामुग्रीसह व सदर जागा भाडेपोटी र.रु.२०,०००/- प्रतिमहा भाडे तत्वावर डॉ.घाटगे यांचे दिलेल्या पत्रातील सर्व शर्ती-अटीस अधीन राहून डॉ.घाटगे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,बायपास रोड,सांगली येथे शिफ्ट करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री. विष्णू माने

उ.आ.अ

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३२

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२८/०७/२०२३ चे या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिकेतील कुपवाड प्रभाग समिती क्र.३ मध्ये अंतर्भुत असलेले गर्व्हमेंट कॉलनी परिसरातील स.नं.१३३,१३२ मधील प्रस्तावित २४ मी.रुंदीचा विकास योजना रस्ता रद्द करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कमल ३७ नुसार मा.महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर विषयामध्ये प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या विषयपत्रामध्ये वस्तुनिष्ठ अहवाल नसल्यामुळे सदर प्रस्तावावर नियमानुसार योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- (नागनाथ ठोबळे)

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १७/०८/२०२३

महासभा क्रमांक :- ०६

ठराव क्रमांक :- ६३३

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२८/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मौजे कुपवाड मधील विकास कॉलनी परिसरातील जुना स.नं.१०७,१०८ या भागातील विकास योजनेनुसार प्रस्तावित करण्यात आलेला १८ मी.रुंदीचा नियोजीत रस्ता रद्द करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ नुसार मा.महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर विषयामध्ये प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या विषयपत्रामध्ये वस्तुनिष्ठ अहवाल नसल्यामुळे सदर प्रस्तावावर नियमानुसार योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- (जगन्नाथ ठोकळे)

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापौर,

स.ल.न.

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३४

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०१/०३/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील खंदक जागेमध्ये भाजी मंडई करिता पोच रस्ता व महानगरपालिकेच्या ताब्यात न आलेल्या जागेचे भूसंपादन करणेसाठी मिरज मंजुर विकास योजना नकाशानुसार कलम ३१ (१) अन्वये पुर्व-पश्चिम नियोजीत १२ मी.रस्ता महापालिकेस रहदारी करणे व भाजी मंडई इमारतीस पोहोच मार्ग म्हणून आवश्यक आहे. तसेच, रस्ता रुंदीमधून जाणाऱ्या व आरक्षण क्र.५४० भाजी मंडईने बाधीत होणाऱ्या मिळकतीचे भूसंपादन करणेकामी प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर विषयामध्ये प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या विषयपत्रामध्ये वस्तुनिष्ठ अहवाल नसल्यामुळे सदर प्रस्तावावर नियमानुसार योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सहा.संचालक नगररचना यांचे दि.०३/०८/२०२३ रोजीचे विषयपत्र नगरसचिव विभागाकडे प्राप्त दि.०९/०८/२०२३ रोजीचे विषयपत्रानुसार मिरज येथील अंतिम भूखंड क्र.५०/२ या भूखंडा समोर असलेला रस्ता हा उत्तर बाजूस डेड एन्ड असून सदर रस्त्याचा वापर पुढील भागामध्ये ये-जा करणेस होत नाही त्यामुळे सदर रस्त्या लगतचे भूखंड क्र.५०/२ या मिळकत धारक श्री.समित चंद्रशेखर कदम यांनी भूखंडाच्या पुर्वेकडील तेवढेच रस्त्याखालील क्षेत्र खरेदी करुन मिळणेस व त्या अनुषंगिक होणारे चालू रेडिरेकनर नुसार खरेदी पत्रक करुन घेणेस तयार असलेबाबत लेखी मागणी केलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर मोजणी केली असता १२.२० मी.रुंदी X ३८.३० मी. लांबी असे एकूण क्षेत्र ४६७.२६ चौ.मी असून, सन २०२३-२४ शिघ्रसिद्धगणामधील खुल्या जमीनीचा दर प्रति चौ.मी. रु.९,३३०/- इतका आहे. त्यानुसार रस्त्याखालील क्षेत्राचे मुल्यांकन र.रु.४३,५९,५३६/- मात्र होत असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) अन्वये सदरची जागा श्री.समित चंद्रशेखर कदम यांना र.रु.४३,५९,५३६/- मात्रच्या रक्कमेस रितसर खरेदीपत्र करुन, खरेदी देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- IAS श्री.मनपु सरगर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १७/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६३५

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३१/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सि.स.नं.५९२ मधील जागा श्री.नागराज सांस्कृतिक भवन ट्रस्ट ई-६४६ सांगली यांना २९ वर्षे मुदतीने महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार भाड्याने देणेस अथवा सदरची जागा लिलाव पद्धतीने देणेस मान्यता देणेकामी प्राप्त प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सि.स.नं.५९२ मधील महापालिकेचे गाळे वगळून उर्वरित जागा मा.सहा.संचालक नगररचना यांनी निश्चित केलेले वार्षिक भाडे र.रु.८०,७५४/- + जीएसटी व इतर कर आकारणी करुन भाडेपट्टयाने श्री.नागराज सांस्कृतिक भवन ट्रस्ट ई-६४६ सांगली यांना २९ वर्षे मुदतीने महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत असून, कलम ७९ (ग) प्रमाणे व धार्मिक बाब असल्याने मंदिरांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षणासाठी सिसिटीव्ही व इतर आवश्यक गोष्टींची पुर्तता संस्थेने करणे तसेच, धार्मिक तेढे निर्माण न होणेची दक्षता संस्थेने घेणेच्या अटीवर ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात गोमाता सेवेसाठी सदैव तत्पर असणारी श्री राधा गोसेवा केंद्र,सांगली यांचेकडून महापालिका क्षेत्रातील आजारी, दुध देत नसणाऱ्या, पालन-पोषण करणेस जमत नसणाऱ्या कसाईकडे कत्तलीसाठी दिलेल्या गायींच्या सुटका करुन त्यांचे पालन-पोषण करण्यासाठी लागणारे औषधे,चारा निवारा शेड तसेच मनुष्य बळाची व्यवस्था या संस्थेकडून केलेली आहे या संस्थेकडे हे कार्य पार पाडण्यासाठी जागा नसलेने या संस्थेने महापालिकेकडे जागा मिळणेबाबत मागणी केलेनुसार श्री.राधा गोसेवा केंद्र सांगली या संस्थेस महापालिका क्षेत्रातील अंदाजे ८ ते १० गुंठे जागा उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील महिला बचत गटांना सक्षम बनविणेसाठी व महिला उद्योगाना चालना मिळणेसाठी महापालिकेच्या महावीर उद्यान, आमराई उद्यान,प्रतापसिंह उद्यान.डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान व मिरज रोड पाण्याची टाकी परिसर येथे महिला बचत गटांना फुड कोर्ट उभारणेसाठी २९ वर्षे मुदतीने भाडेपट्टयाने जागा देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.गजानन आलदर

D. P. Suryavanshi
महापौर,